# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018,

## स्थानिक संस्था कर कार्यालय,

कार्यालय दूरध्वनी क्रमांक :-020-39331323

Web.:-www. pcmcindia.gov.in E-mail- lbt@pcmcindia.gov.in


---

जावक्र क्रमांक-LBT/06 /कावि/97/2015 दिनांक- 13/04/2015

**(महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम-2010 मधील नियम-48(6) अन्वये)**

## जाहीर सूचना

**विषय - सन 2013-14 चे वार्षिक विवरण पत्र (E-II) सादर न केलेबाबत......**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे स्थानिक संस्था करासाठी नोंदणीकृत असलेल्या व्यापारी/व्यावसायिक यांना कळविणेत येते की, ज्या व्यापारी/व्यावसायिक यांनी सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे वार्षिक विवरणपत्र महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम 29 मधील तरतूदीनुसार सादर केलेले नाही. तसेच वार्षिक विवरणपत्र सादर करणेकामी नियम 33(7) नुसार नमुना “ज” नोटीस देवूनही कार्यवाही केलेली नाही.

अशा सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे वार्षिक विवरणपत्र सादर न केलेल्या व्यापारी/व्यावसायिक यांनी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियमांचे उल्लंघन केल्याने संबंधीतांना नियम 48(6) मधील तरतूदीनुसार र.रु.5000/- शास्तीची आकारणी का करणेत येवू नये. याबाबतचा लेखी खुलासा वार्षिक विवरणपत्रासह दि.10/05/2015 पर्यंत सादर करणेस अंतिम संधी देणेत येत आहे.

तरी सदर जाहीर सूचनेत नमूद केलेप्रमाणे व्यापारी/व्यावसायिक यांनी पूर्तता न केल्यास वरीलप्रमाणे कारवाई करणेत येईल तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 152 ल मधील तरतूदीनुसार संबंधीतांवर विरुध्द पुढील कारवाई प्रस्तावित करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

(डॉ.यशवंतराव माने)
**सहाय्यक आयुक्त**
स्थानिक संस्था कर विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018.

ठिकाण :- पिंपरी
दिनांक :-18/04/2015